Vol. 1, Issue II / March 2011, pp.79-83

Research Paper - Economics

# महाराष्ट्रातील बिगर - कृषी सहकारी पतसंस्थांचे ग्रामीण विकासातील योगदान

प्रा. पी. बी. गायकवाड
इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट कॉम्प्युटर अॅन्ड रूरल डेव्हलपमेंट वासूंबे, सांगली

प्रा. पी. बी. लुपणे
क्रांती अंग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल

**प्रस्तावना:—**

सहकार क्षेत्रात महाराष्ट्र हे भारतातील एक अग्रगण्य राज्य आहे. १०५ हुतात्मांच्या बलीदानानंतर भारतीय संघराज्यात मराठी भाषिकांचे १४ वे राज्य म्हणून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. स्वातंत्र्य चळवळीचा लढा देत असताना महात्मा गांधीजींनी सहकारी चळवळीचा पुरस्कार केला. त्यामधून सहकारी चळवळीच्या संघटनेचे 'आत्मा' असलेले श्री वैकुंठलाल मेहता, धनंजयराव गाडगीळ यासारखे खंदे पुरस्कर्ते व विचारवंत निर्माण झाले. एवढेच नव्हे तर यशवंतराव चव्हाण, विठ्ठलराव विखे— पाटील, वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, गुलाबराव पाटील, तात्यासाहेब कोरे, शंकरराव मोहीते, शरद पवार इत्यादींच्या प्रेरक मार्गदर्शनाखाली सहकार चळवळीने महाराष्ट्रात भरीव कामगिरी केली आहे.

प्रस्तुत शोध निबंध हा महाराष्ट्रातील बिगर कृषी पतसंस्थाची प्रगती, ग्रामीण भागातील स्थान, विकास, भूमिका, योगदान, त्यांच्या पुढील आव्हाने व उपाययोजना इत्यादी बाबींचा आढावा घेण्याच्या उद्देशाने तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर शोध निबंध हा संपूर्णत: दुयम सामग्रीवर (Secondary Data) आधारित आहे.

**सहकार— अर्थ**

'सहकार' (Co- Operation) हा मूळ शब्द लॅटिन 'को— ऑपरेरी (Co- Operari) या शब्दापासून बनला आहे. 'Co' याचा अर्थ 'सह' आणि 'Operari' याचा अर्थ 'काम करणे' असा होतो. दोन्ही शब्दांचा एकत्रितपणे विचार केल्यास 'एकत्रितपणे काम करणे' किंवा 'परस्पर सहकार्याने काम करणे' असा होतो.

सहकाराची वृत्ती मानवात उपजतच असते. ही एक नैसर्गीक भावना आहे. या नैसर्गिक भावनेमुळेच अनेक व्यक्ती एकत्र येतात, एकत्र काम करतात, एकत्र राहतात. तसेच अडचणीच्या प्रसंगी एकमेकांना मदत करतात. मानवाने एकत्र राहण्याचे, काम करण्याचे हे तत्व नैसर्गीकदृष्ट्या मात्र नवीन नाही. कारण सहकारी जीवनपध्दती प्राण्यांच्यातसुध्दा आढळते. या संदर्भात बोगार्डस् याने आपले असे मत व्यक्त केले आहे की, समाजाची निर्मीती ही सहकार प्रक्रियेचाच परीणाम आहे, तर मुंग्या, मधमाशा, गांधीलमाशा व सिंह इ. प्राण्यांचे जीवन हे नैसर्गिक व उत्स्फूर्त सहकार्याचे उत्तम उदाहरण आहे.

**सहकाराचा उगम —**

सहकाराची जन्मभूमी ही इंग्लंडच आहे. सन १८४४ मध्ये रॉश्डेल येथील २८ कामगारांनी एकत्र येवून 'ग्राहक सहकारी भांडाराची' स्थापना केली. १८४४ मध्ये स्थापन केलेली ही संस्था सहकाराच्या ऐतिहासिक प्रारंभातील 'मैलाचा दगड' म्हणून ओळखली जाते. कारण तिच्यामुळे त्या काळात अशा प्रकारच्या सहकारी संस्था जगातील अनेक देशात स्थापन झाल्या.

जगातील बहुतेक देशांत सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या असल्या तरी त्या— त्या देशांच्या गरजेनुसार त्यांच्या स्वरुपात भिन्नत्व आढळते. १९ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती होवून देशभर सहकारी चळवळ पसरली. २० व्या शतकात अनेक देशांनी आर्थिक व सामाजिक बदलाचे साधन म्हणून

सहकाराचा स्वीकार केला. जर्मनीमध्ये ज्यू सावकारांच्या जुलमातुन सुटका करुन घेण्यासाठी एफ्. डब्ल्यू. रफायझन व फॅन्झ शुल्झ यांच्या पुढाकाराने सहकार चळवळ सुरु झाली. रशियांत क्रांतीकारकांच्या परिवर्तनाचे साधन म्हणून सहकारी माध्यमातून सहकारी चळवळ सुरू झाली. शेतीमालास योग्य किंमत मिळावी म्हणून डेन्मार्कमधील शेतकरी, सहकारी चळवळीत पडले. इस्त्राईलमध्ये ज्यू कामगारांच्या चळवळीचा सहकार हा एक भाग होता. भारत, चीन व जगातील इतर विकसनशील देशांनी दारीद्र्य व मागासलेपणा या समस्यांवर मात करण्यासाठी सहकाराचा मार्ग अवलंबला.

**भारतातील सहकारी चळवळ–**

भारतात ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाचा कर्जबाजारीपणा आणि त्यातुन उद्‌भवणारे आर्थिक प्रश्न यांची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने सहकारी चळवळीची निर्मिती झाली. १८७५ मध्ये सावकारी पिळवणूक थांबवणारे काही कायदे करण्यांत आले. नंतर १८९५ साली 'रफायझन सहकारी संस्थे' सारख्या संस्था भारतात स्थापन करण्याची शिफारस करून १९०४ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळाने सहकारी तत्वावर पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची तरतुद करणारा भारतातील पहिला सहकारविषयक कायदा संमत केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सरकारने पंचवार्षिक योजनांचा स्वीकार केला. देशाच्या आर्थिक विकासाचे महत्वाचे साधन म्हणून सहकाराला महत्वाचे स्थान देण्यांत आले. सहकाराच्या विकासाकरीता सरकारने योजनाबद्ध कार्यक्रम आखले. अनेक तज्ज्ञांच्या विविध समित्या स्थापन करून त्यानुसार सहकार चळवळीत काळानुरूप बदल करण्यांत आले. त्यामध्ये डॉ. ए. डी. गोरवाला समिती, वैकुंठलाल मेहता समिती, श्री. एस्. डी. मिश्रा समिती, गाडगीळ समिती, श्री व्यंकटपय्या यांची अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समिती, खुर्सो समिती इत्यादी समित्या स्थापन करून सहकारी चळवळीला योग्य दिशा देण्याचे कार्य करण्यांत आले.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ–

भारतात पहिला सहकारी संस्थांचा कायदा १९०४ साली अस्तित्वात आल्यानंतर त्यातील त्रुटी १९१२ च्या सहकार कायद्याने दुर करण्यांत आल्या. १९१९ नंतर सहकार हा विषय राज्य सरकारच्या आखत्यारीत गेला. महाराष्ट्र राज्यासाठी स्वतंत्र सहकारी कायदा करण्याकरीता जी. एम्. लाड यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती नेमण्यांत आली. या समितीने १९६० मध्ये आपला अहवाल सादर केला व त्याचे कायद्यांत रूपांतर होवून २६ जानेवारी १९६२ पासून या कायद्याची आंमलबजावणी करण्यांत आली.

महाराष्ट्राच्या निर्मितीवेळी महाराष्ट्राची लोकसंख्या ३.९६ कोटी होती. यामध्ये ग्रामीण लोकसंख्या ७१टक्के इतकी होती. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती होता, परंतू शेतीचे स्वरूप पारंपारीक होते. त्यामुळे ग्रामीण जनता सावकाराच्या पाशात अडकली होती. त्यातुन सुटका करण्यासाठी १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र सहकार कायदा करण्यांत आला. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात सहकार चळवळीची वाढ आणि विस्तार झपाट्याने झाला. आज भारतातील इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात सहकारी क्षेत्र मोठे आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही महाराष्ट्राची बलस्थान बनली आहे. सहकारी चळवळीने महाराष्ट्रात हरित क्रांती, धवल क्रांती, औद्योगिक क्रांती घडवली. महाराष्ट्रात जवळजवळ ५८ प्रकारच्या २ लाखाहून जास्त सहकारी संस्था कार्यरत आहेत.

महाराष्ट्र राज्याने गेल्या ५० वर्षात आर्थिक विकासाचा महत्वपूर्ण टप्पा गाठला आहे. कोणत्याही राज्यांच्या आर्थिक विकासाकरीता बँका व पतसंस्था महत्वाची भूमिका बजावतात. यामध्ये राष्ट्रीय बँका, व्यापारी बँका, औद्योगिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांचा समावेश होतो. राज्यातील ग्रामीण भागांत कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्था हाच प्रभावी मार्ग आहे. ग्रामीण भागात सहकारी पतसंस्थांचे मोठे जाळे पसरले आहे. अनेक वर्षापासून सहकारी पतसंस्था ग्रामीण विकासाला चालना देण्याचे कार्य करीत आहेत. महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थांचा कर्ज पुरवठ्याबाबतचा इतिहास प्रगतीचाच आहे. ग्रामीण विकासाच्या प्रगतीमध्ये सहकारी पतसंस्थांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली आहे. त्या ग्रामीण विकासाचा कणा बनल्या आहेत.

**महाराष्ट्रातील एकूण सहकारी चळवळीची प्रगती–**

सहकार चळवळीने अनेक वर्षांपासून समाजातील सामान्यातील सामान्य माणसापर्यंत जावून त्यालाही पतसंस्था चळवळ आपली वाटावी, अडचणीत पतसंस्थेची आठवण यावी, लग्न वा छोट्या – मोठ्या धंद्यासाठी किंवा तत्सम् कामासाठी आपल्याला कर्ज घ्यायचे मनात आले तर त्याच्या डोळ्यासमोर पतसंस्थाच यावी इतपत काम ग्रामीण भागातील बिगर – कृषी पतसंस्थानी केले आहे. अगदी भाजीपाला विक्रेते, फेरीवाले, टपरीवाले इ. पासून मोठमोठ्या कारखानदारांपर्यंत सर्वांना या पतसंस्थांनी एक वेगळी ओळख, एक प्रतिष्ठा समाजात निर्माण करून दिली आहे. एका बाजूला ग्रामीण भागातील सावकारी संपवण्याचे काम करीत आर्थिक दरी कमी करण्याचा प्रयत्न या पतसंस्थांनी केला आहे. त्याचप्रमाणे ठेवीदारांनादेखील आपल्या रकमांना यथायोग्य व्याज मिळवून देण्याचे काम ही या पतसंस्थांनी केले आहे.

तक्ता क्र. १


महाराष्ट्रातील एकूण सहकारी चळवळीची प्रगती

| वर्ष | एकूण सहकारी संस्था संख्या | बिगर कृषी सहकारी पत संस्था संख्या | एकूण सहकारी संस्थांच्या प्रमाणात झालेली वाढ (टक्के) |
|---|---|---|---|
| २००१ | १५८०१६ | २२०१४ | १३.९६ |
| २००२ | १६५७८९ | २३५५५ | १४.२१ |
| २००३ | १७३४०२ | २५१०९ | १४.४८ |
| २००४ | १७८८५४ | २५६६६ | १४.३५ |
| २००५ | १८४३९० | २६१४७ | १४.१८ |
| २००६ | १९२७९७ | २६१९१ | १३.५८ |
| २००७ | २००७४० | २६६३१ | १३.२७ |
| २००८ | २०५७५३ | २५१०२ | १२.२० |
| २००९ | २१२३४४ | २४१६७ | ११.३८ |

संदर्भ– महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेपात: २००९

आलेख क्र. १

एकूण सहकारी संस्थांच्या प्रमाणात झालेली वाढ (टक्के)




२००१ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या १५८,०१६ लाख इतकी होती. ती २००९ अखेर २१२,३४४ लाख इतकी झाली.

बिगर कृषी पतसंस्थांच्या बाबतीत २००१ मध्ये २२,०४४ एवढी असणारी संख्या २००९ अखेर २४,१६७ इतकी झाली. एकूण संस्थांच्या प्रमाणांत बिगर कृषी सहकारी पतसंस्थेच्या बाबतीत,वाढ न होता घट झाली आहे. ही घट १३.९६ टक्क्यांवरून ११.३८ टक्के अशी झाली आहे. सन २००१ पासून २००३ पर्यंत एकूण सहकारी संस्थांच्या प्रमाणांत बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या संख्येत वाढ होवून नंतर त्यात क्रमाक्रमाने घटच होत गेल्याचे दिसून येते.

हेन्री बुल्फ या अर्थशास्त्रज्ञाने सहकारी पतसंस्थेचे स्पष्टीकरण करताना असे म्हटले आहे की, "आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तीकडे उपलब्ध असलेले तारण स्वीकारून आणि प्रचलित नियमानुसार व्याज आकारणी करून, कर्जपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्था म्हणजे पतसंस्था होय."

सहकारी पतपुरवठा या व्यापक संकल्पनेत ग्राम स्तरावर काम करणाऱ्या प्राथमिक पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राज्य सहकारी बँक अशी चढती रचना असते. पतसंस्थाच्या स्थापनेसाठी पाचशे कुटुंबे किंवा पाच ते सहा किलोमीटर कार्यक्षेत्रातील तीन हजारांपर्यंतची लोकसंख्या ही किमान मर्यादा असते. अशा संस्थांचा उद्देश सभासदांना अर्थपुरवठा करणे असला, तरी याव्यतिरिक्त कर्जाच्या वापरावर लक्ष ठेवणे, कर्जाची वसुली करणे, बचतीस प्रोत्साहन देणे इ. कार्येही पार पाडली जातात.

बिगरशेती पतपुरवठा सहकारी संस्थेत नागरी सहकारी बँक, नागरी सहकारी पतसंस्था, पगारदार सेवकांच्या सहकारी पतपेढ्या, महिला सहकारी पतसंस्था, व्यावसायिकांच्या सहकारी संस्थांचा समावेश होतो.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. या शेतीला आणि विशेषत: ग्रामीण अर्थव्यवस्थेला पतपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्था हे एक प्रभावी साधन आहे. बिगरशेती क्षेत्रातील कनिष्ठ उत्पन्न गटातील लोकांना वित्तपुरवठा करण्यासाठी बिगरशेती सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करण्यांत येतात. त्यांची संख्या ग्रामीण भागात लक्षणीय आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी अशा पतसंस्थाचा हातभार फार मोठा आहे. सध्या महाराष्ट्रात २२ हजार पतसंस्था आहेत. त्यामध्ये २ कोटी ठेवीदारांच्या जवळजवळ २२ हजार कोटी आहेत. केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर अशा पतसंस्थांचा प्रसार प्रामुख्याने शहरी भागातील पगारदार व औद्योगिक कामगारांत झाला आहे. महाराष्ट्र राज्याचे वेगाने शहरीकरण होत आहे. त्याचा प्रत्यक्ष परीणाम म्हणून नागरी सहकारी बँका आणि बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या प्रमाणांत होत गेलेली वाढ होय. ग्रामीण भागातील कृषी पतसंस्थांनी केलेल्या कर्जवाटपापेक्षा बिगरशेती पतसंस्थांनी केलेले कर्जवाटप दहापटीने जास्त आहे. या पतसंस्थांचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे–

१. समाजात व्यक्तीची पत निर्माण करणे.
२. लेकांना बचतीची सवय लावणे.
३. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे.

४. ग्रामीण भागात उद्योग उभारण्यासाठी लोकांना उद्युक्त करणे.
५. ग्रामीण भागात औद्योगिकीकरण साध्य करणे.
६. सभासदांना अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणे.
७. ग्रामीण भागात लोकशाहीच्या तत्वानुसार जागरूक नागरिक निर्माण करणे.
८. सभासदांना हक्क, कर्तव्ये व जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.
९. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे संघटन व नियमन कसे करावे, याचे ज्ञान सभासदांना देणे.

**ग्रामीण विकासातील योगदान–**

महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रातील अग्रगण्य राज्य असून त्याने ग्रामीण विकासाला चालना दिली आहे. अशा बिगर कृषी पतसंस्थांचे ग्रामीण विकासातील योगदान खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उत्पादक कामासाठी संघटीत करून अनेक पतसंस्थांची निर्मिती करून ग्रामीण विकासाला चालना दिली आहे.
२. ग्रामीण भागात शेती व्यतिरिक्त पर्यायी रोजगाराची उपलब्धता अत्यल्प असल्याने, कृषी क्षेत्रातील अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर इतर कृषी पुरक व कृषी आधारीत उद्योगांची स्थापन करण्यांत केला आहे. यांमध्ये दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, ग्रामोद्योग यांत हस्तशिल्प, कुंभारशिल्प व्यवसाय, काष्ठशिल्प, विणकाम इ. चा समावेश होतो.
३. अशा उद्योगामुळे कृषी क्षेत्रातील सुप्त बेरोजगारीचा प्रश्न कमी होवून ग्रामीण भागातच रोजगार उपलब्ध करून, ग्रामीण भागाच्या विकासाबरोबरच शहरांवरील अतिरिक्त ताण व बोजा कमी झाला आहे.
४. ग्रामीण भागातील शेतमजूर, भूमिहीन मजूर, कारागीर आणि इतर दुर्बल घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी केले आहे.
५. सहकार हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्याचे प्रभावी साधन आहे. बिगर कृषी सहकारी पत संस्थांच्या कार्यामुळे ग्रामीण भागात आर्थिक संपन्नता निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील दारिद्रयाची तीव्रता कमी झाली आहे.
६. रोजगार वाढ, दारीद्रय निर्मुलन आणि उत्पन्नात वाढ होवून ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पादकतेतही वाढ झाली आहे.
७. ग्रामीण भागातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या सहकार्यामुळे साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होवून त्याचा फायदा उत्पन्नात व उत्पादनातील वाढीवर झाला आहे.
८. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागांचा विकास करण्यांत बिगर कृषी सहकारी पतसंस्थांचा खुप मोठा वाटा आहे. त्यामुळे अशा भागांत दुरसंचार, दळणवळण, पाणीपुरवठा, वीज पुरवठा इ. सोयी उपलब्ध झाल्या आहेत.
९. ग्रामीण भागातील व्यापारी, सावकार, जमिनदार अशा घटाकांकडून होणारे आर्थिक शोषण व फसवणूक कमी करण्यांत बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी पुढाकार घेतला आहे.
१०. सहकारी पतसंस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकीच्या निमित्ताने ग्रामीण भागात राजकीय जाणीव– जागृती झाली आहे.
११. अशा पतसंस्थांत ग्रामीण भागातील सर्व जाती– धर्माचे लोक असतात. त्यामुळे समता व एकतेच्या माध्यमातून आपापसातील हेवेदावे, मत्सर इ. वृत्ती लोप पावतात व सामाजिक स्वास्थ्य सदृढ राखले जाते.
१२. बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागातील दुर्बल व तळागाळातील व्यक्तींच्या जीवनात सुधारणा झाली आहे.

भारतात सर्वाधिक सहकारी पतसंस्था, बँका, साखर कारखाने व इतर सहकारी संस्था महाराष्ट्रात आहेत. सहकारी पतसंस्थांनी महाराष्ट्रात सर्वसामान्य व गोरगरिबांना आर्थिक मदतीचे हात देवून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे पतसंस्था चालविणे म्हणजे सतिचं वाण आहे. समाजसेवा आहे. सहकार आहे. अशी भावना वाढीस लागत असून अशा पध्दतीने काम करणाऱ्या पतसंस्थांचा भविष्यकाळ उज्वल आहे. पतसंस्था, कर्मचारी यांनी जर काही महत्वाच्या बाबातीत आर्थिक स्वयंशिस्त बाळगली तर निश्चितच भविष्यात सहकारी पतसंस्था सक्षमरित्या उभ्या

राहतील. प्रामुख्याने दैनंदिन व्यवहार करताना पुढील मुद्दे लक्षात घेतले तर ते सोईचे होईल.

१. कर्ज देताना फक्त दर महा हप्तेबंदी परतफेडीचीच द्यावीत.
२. कर्ज खात्याचे व्याज प्रत्यक्ष रोख रक्कम जमा झाल्याखेरीज कर्ज खाते नांवे टाकून नूतनीकरण करू नये.
३. कर्ज वाटप करताना कर्ज, ठेवी, गुंतवणूक यांचा सी. डी. शासनाच्या आदेशाप्रमाणे काटेकोर ठेवावा.
४. कर्जमंजुरी करताना एकूण वाटप झालेली कर्जे ताळेबंदास एकूण ठेवीच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त झाल्यास कर्जमंजुरी व वाटप न करता कर्ज वसुलीवर लक्ष केंद्रित करावे.
५. सभासदांना भाग लाभांश १० टक्क्यांपेक्षा जास्त देवू नये.
६. सभासद, ठेवीदार व खातेदारांना आकृष्ट करण्याकरिता ठेव बक्षीस योजना राबवू नयेत.
७. थकबाकी वसूलीची प्रक्रिया ३ हप्ते थकल्यानंतर लगेचच सुरू करावी.
८. कर्ज मंजुरी करताना कर्ज अर्जाबरोबर त्या कर्जास सूचक व शिफारस पत्र असावे.
९. संस्थेची गुंतवणूक एकूण ठेवीच्या २५ ते ३० टक्के बंधनकारक असावी.
१०. कर्जवाटप करताना त्या कर्जदाराची परतफेड क्षमता, उत्पन्नाची साधने, समाजातील पत, सक्षम जामीनदार, कर्जदाराच्या जामीनदाराच्या सांपत्तीक स्थितीची माहिती संस्थेकडे असावी.
११. कर्ज वसूली परतफेड अल्पबचत माध्यमातून न घेता रोख स्वरूपात दररोज/हप्ता/दरमहा कर्ज खाते परतफेड करूनच घ्यावी.
१२. ठेवीदारांच्या पैशावरच पतसंस्थांचे अर्थकारण चालते. त्यामुळे त्या पतसंस्थांच्या व्यवस्थापनात ठेवीदारांना सहभागी करून घ्यावे.
१३. एकाच व्यक्तीला मोठ्या प्रमाणांत कर्ज न देता छोटी – छोटी कर्जे अनेक व्यक्तींना द्यावीत, की ज्यायोगे धोक्याचे विविधीकरण होवून मोठे कर्ज बुडण्याचे प्रमाण कमी होईल.
१४. पतसंस्था चालकांनी अर्थकारण व राजकारण यांची सरमिसळ करू नये. त्यामुळे कर्ज वसूलीचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

अशा प्रकारे पतसंस्थांनी भविष्यात वाटचाल केली तर सहकारी पतसंस्थांचा भविष्यकाळ उज्वल राहील व कष्टकरी व अल्प उत्पन्न गटातील जनतेसाठी सूक्ष्म अर्थपुरवठा(Micro- Finance) होवून त्यांच्या विकासाला गती मिळेल.

**समारोप–**

सुरूवातीच्या काळात शेतकऱ्यांना सावकाराच्या तावडीतून सोडविण्यासाठी सहकारी चळवळ सुरू झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात व स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १०० वर्षात सहकारी चळवळीने वेगवेगळ्या क्षेत्रात महत्वपूर्ण कामगीरी केली आहे. ग्रामीण भागाचा चेहरा बदलण्यासाठी बिगर– कृषी सहकारी पतसंस्थाचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या योगदानामुळेच ग्रामीण भागाचा विकास साध्य झाला आहे. असे असले तरीही आत्ताच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सहकारी पतसंस्थासमोर स्पर्धा, वाढती थकबाकी, निष्ठावान नेतृत्वाचा अभाव, सदोष कर्जवाटप पद्धती अशी अव्हाने आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती केवळ संख्यात्मक झाली असून गुणात्मक झाली नाही. जागतिकीकरणाच्या प्रवाहात जर पतसंस्थांना यशस्वी वाटचाल करावयाची असेल तर अशा आव्हानांना सामोरे गेलेच पाहिजे. यासाठी काटकसर व बचत वाढविणे, थकबाकीची वसूली, कार्यक्षम नेतृत्व व व्यवस्थापन, सहकार शिक्षण व प्रशिक्षण, प्रभावी देखरेख व अंकेक्षण इ. उपाययोजना करणे आवश्यक आहे. तरच सहकाराचा मुळ उद्देश सफल होवून ग्रामीण भागाच्या विकासातील बिगर– कृषी सहकारी पतसंस्थांचे योगदान सार्थकी लागेल.

**संदर्भ :–**

**पुस्तके** :–

१. प्रा. मोहन सराफ व प्रा. डॉ. रूपा शहा, 'सहकाराचा विकास बी. कॉम भाग ३', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, सप्टेंबर, १९९९.
२. प्रा. डॉ. सी. जे. जोशी, 'सहकाराचा विकास बी. कॉम भाग ३', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जून, २००५.
३. प्रा. के. एम. भोसले व प्रा. के. बी. काटे, 'सहकार बी. ए. भाग २', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सुधारित तिसरी आवृत्ती, सप्टेंबर, २००१